# कृषी विभाग

कृषि विभागाकडे प्रामुख्याने शेतक-यांना आवश्यक असणा-या निविष्ठा पुरवठयाचे काम आहे.त्या मध्ये खते ,बियाणे,किटकनाशके,औजारे यांचा समावेश आहे.जिल्हयामध्ये आवश्यक असणारा खताचा साठा गरजेइतके बियाणे व किटकनाशके ही निरनिराळया विक्री केंद्गावर उपलद्व करुन ठेवणे, त्यावर नियंत्रण ठेवणे हे या विभागामार्फत पाहीले जाते सदर कामाचे सयनियंत्रण पंचायत समिती स्तरावरील कृषी विभागामार्फत करणेत येते.

या विभागाच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीसाठी कृषी विकास अधिकारी( वर्ग-१),जिल्हा कृषी अधिकारी (वर्ग-२),मोहीम अधिकारी (वर्ग-२) या शिवाय पंचायत समिती स्तरावर कृषी अधिकारी वर्ग-३-२१ पदे,तर विस्तार अधिकारी कृषी ३२ पदे मूंजर आहेत.

जिल्हाची थेडक्यात माहीती खालील प्रमाणे आहे.

| **बाब/तपशिल** | **सन २०१५-१६ (क्षेत्र हेक्टर)** |
|---|---|
| भौगोलिक क्षेत्र हेक्टर | ७,७६,३०० |
| जंगल क्षेत्र | १,४०,००० |
| बिगर शेती उपयोगीताकरीता आणलेले क्षेत्र | ३६,२०० |
| ओसाड व मशागतीस अयोग्य क्षेत्र | ४४,२०० |
| कायम स्वरुपी चराऊ कुरने | ४१,१०० |
| लागवडीलायक क्षेत्र हेक्टर | ४,७६,६०० |
| खरीप हंगाम सर्वसाधारण क्षेत्र ऊसासह हेक्टर | ३,७८,८४८ |
| रब्बी हंगाम सर्वसाधारण क्षेत्र हेक्टर | २१,०२३ |

| | |
|---|---|
| उन्हाळी हंगाम सर्वसाधारण क्षेत्र हेक्टर | ५०५० |
| ऊसाचे सर्वसाधारण क्षेत्र हेक्टर | १,८६,९०५ |
| जिल्हा सरासरी पाऊस मि.मि. | १८९९ मि.मि. |

# योजना

**कृषि विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूर.**

**१. योजनेचे नांव :- राष्ट्रीय बायोगॅस विकास योजना-**

**योजनेची संक्षिप्त माहिती :-** स्वयंपाकासाठी बायोगॅस पुरविणे , एल.पी.जी.व इतर पांरपारीक उर्जा साधनांचा वापर कमी करणे, एकात्मीक उर्जा घोरणात नमुद केल्यानुसार स्वंयपाकासाठी आवश्यक उर्जा मिळविणे , रासायनीक खताचा वापर कमी करुन सेंद्रीय खताचा वापर करण्यास लाभार्थिना प्रवृत करणे , ग्रामीण भागातील स्त्रीयांचे जीवनमान सुधारणे व त्याना होणारा त्रास कमी करणे. , बायोगॅस सयंत्रास शौचालय जोडून ग्रामीण भागातील स्वच्छता राखण्यास मदत करणे , कार्बनडायऑक्साइड आणि मिथेन यासारख्या वायूंचे वातावरणातील उत्सर्जनाचे प्रमाण घटवून वातावरण बदलांचे नियमन करणे, निसर्गातील वृक्ष तोडीस आळा घालून निसर्गाचा समतोल राखणे , बायोगॅस पासून विज निर्मीती करून कौटूबिक गरजा भागविणे इ. बाबी बायोगॅस उभारणीतून साधता येतात.

**योजनेचे निकष :-** ग्रामीण भागातील ज्या लाभार्थिकडे स्व:ताची जनावारे व बायोगॅस बांधकामासाठी जागा असणारे लाभार्थी योजनेसाठी पात्र आहेत.

**योजनेचे फायदे :-**

- बायोगॅस सयंत्रामध्ये कुजवण्याची प्रकीया बंद जागेत होत असते तो वातावरणात पसरत नाही तर त्यापासुन गॅस निर्माण होतो व त्या वायुचे स्वयंपाकासाठी ज्वलंन होते व त्यातुन विषारी वायुचा नायनाट होतो त्यामुळे व प्रदुषण होत नाही.
- बायोगॅस सयंत्रामधुन बाहेर पडणारी रबडी (स्लरी) म्हणजे शेतीसाठी लागणारे उत्कृष्ट दर्जाचे सेंद्रीय खत होय. त्यामुळे जमिनीची पोत सुधारते. व पिकांच्या उत्पादनातही वाढ होते.
- घरगुती चुलीमुळे होणा-या धुरातील कार्बन डाय ऑक्साइड या विषारी वायुचे प्रदूषण होते तसेच महीलांच्या डोळयांसाठी सुध्दा अपायकारक आहे.हे आपल्याला बायोगॅसमुळे टाळता येते. स्वंयपाक कमी वेळेत करता येतो. रिकाम्या जागेत केलेल्या मानवी व पशु विष्ठेमुळे हवेतील प्रदुषणामुळे व डासांमुळे कॉलरा , गॅस्ट्रो, मलेरिया, डेंगु इ. महाभयंकर रोगांचा फैलाव होतो. तो आपण सयंत्र व शौचालय जोडल्यामुळे रोखु

शकतो. व ग्रामीण भागातील जनता आरोग्यदायी होवुन गाव प्रदुषण मुक्त होते. म्हणजेच निर्मल गाव स्वच्छ व सुंदर बनते.

- गोबरगॅससाठी शेंणाची गरज असल्यामुळे जनावरे पाळणे हे आवश्यक आहे. परंतु जनावरांमुळे आपल्याला शेंतीची मशागत व त्यांच्यापासुन मिळणारे दुधदुभते यामुळेही आर्थिक फायदा होतो.
- घरगुती चुलीसाठी लाकडांचे जळन आवश्यक असते सर्वसाधारण पणे एका कुटूबांसाठी वर्षाकाठी एका वृक्षाचे लाकुड जळणासाठी लागते त्यामुळे मोठया प्रमाणात वृक्ष तोड होते परंतु बायोगॅस मुळे जंगल तोडीस आपोआपच आळा बसतो.
- बायोगॅस योजनेचा महत्वाचा फायदा म्हणजे बायोगॅस सयंत्रास शौचालय जोडल्यामुळे ग्रामीण भागागतील स्वच्छतेचा प्रश्न निकाली काढण्यासाठी मदत होते.

**बायोगॅस बांधकाम केलेस मिळणारे अनुदान :-**

ग्रामीण भागात बायोगॅस बांधकाम केलेस केंद्र शासनाचे नवीन आणि नवीकरणीय मंत्रालया मार्फत खालील प्रमाणे अनुदान दिले जाते.

<table>
<tr><th>अ.न.</th><th>सयंत्राची क्षमता घ.मी.</th><th>बायोगॅस सयंत्रासाठी मिळणारे अनुदान रुपये</th><th>मागास वर्गीयांसाठी रुपये</th><th>बायोगॅसला शौचालय जोडलेस मिळणारे अनुदान सर्वांसाठी रु.</th></tr>
<tr><td>1</td><td>1</td><td>9800/-</td><td>17000/-</td><td rowspan="4">रुपये 1600/-<br>प्रती सयंत्र</td></tr>
<tr><td>2</td><td>2</td><td rowspan="3">14350/-</td><td rowspan="3">22,000/-</td></tr>
<tr><td>3</td><td>3</td></tr>
<tr><td>4</td><td>4</td></tr>
</table>

बायोगॅस बांधकामासाठी लाभार्थिची अर्थिक कुवत नसेल तर त्यासाठी राष्ट्रीयकृत व सहकारी बँका कडूनकर्ज  पुरवठा केला जातो व मिळणारी अनुदानाची रककम लाभार्थींना दिली जाते.

**योजनेचे नांव :- डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना.**

**योजना कोणाची :- राज्य पुरस्कृत.**

**योजनेची संक्षिप्त माहिती** :- अनु.जाती व नवबौध्द शेतक-यांचे कृषि उत्पन्न वाढवून त्यांना दारिद्रेरेषेच्या वर आणण्यास सहाय्य करणेच्या दृष्टीने जिल्हा परिषदेच्या कृषि विभागामार्फत विशेष घटक योजना सन 1982 पासून राज्यात राबविणेत येते. सदर योजनेअंतर्गत अनु.जाती व नवबौध्द प्रवर्गातील शेतक-यांना नविन विहिर , जुनी विहीर दुरुस्ती , शेततळ्याचे प्लास्टिक अस्तरीकरण, इनवेल बोअरिंग, वीज जोडणी आकार, पंपसंचासाठी(इलेक्ट्रीक मोटर / डीझेल इंजीन), सोलर पंप वीज जोडणी आकार व पंपसंच , एचडीपीई पीव्हीसी पाईप, सूक्ष्म सिंचन संच, तुषार सिंचन संच, ठिबक सिंचन, यंत्रसामुग्री (बैलचलित / ट्रॅक्टर चलित अवजारे) (नविन बाब) , परबाग इ.बाबींचा लाभ देणेत येत होता. सदर योजनेचे पूर्नविलोकन करणेचा निर्णय शासनाने घेतला असून सन 2016-17 पासून डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेच्या माध्यमातून अनु.जातीच्या शेतक-यांना आर्थिक दृष्टया स्वावलंबी बनविण्याकरिता डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेअंतर्गत खालील घटकांसाठी अनुदान देणेत येईल.

सदर योजनेमध्ये सन 2024-25 या वर्षामध्ये नमूद केलेल्या 11 घटकांसाठी अनुदान देय आहे. 1)नविन सिंचन विहीर र.रु. 4,00,000 2)जुनी विहीर दुरुस्ती रु. 1,00,000/- 3) शेततळयाचे प्लास्टिक अस्तरीकरण रु. 2,00,000/- 4) इनवेल बोअरिंग रु. 40,000/- 5) विज जोडणी आकार र. रु.20,000/- 6) पंपसंचासाठी (इलेक्ट्रीक मोटर/डीझेल इंजीन रक्कम रु.40,000/- 7) सोलर पंप वीज जोडणी आकार व पंपसंच रु. 50,000/- 8) एचडीपीई पीव्हीसी पाईप रु. 50,000/- 9) सूक्ष्म सिंचन संच 9.1 तुषार सिंचन संच पुरक अनुदान 47000/-यापैकी जे कमी असेल ते अनुदान देय राहील . 9.2 ठिबक सिंचन 97,000/- अनुदान यापैकी जे कमी असेल ते . 10) यंत्रसामुगी (बैलचलित / ट्रॅक्टर चलित अवजारे) (नवीन बाब) रु. 50,000/- 11) परसबाग रु. 5,000/- सदर योजनेअंतर्गत वरील प्रमाणे बाबीं असून देय लाभ हा पॅकेज स्वरूपात दयावयाचा आहे. योजनेसाठी विहीत अटी व शती पूर्ण करणा-या शेतक-यास खालीलपैकी कोणत्याही एका बाबीचा लाभ घेता येईल

सदर लाभार्थींकडे किमान 0.40 हेक्टर व कमाल ६ हेक्टर एवढी शेतजमीन असणे आवश्यक असेल. मात्र, लाभार्थ्याच्या जमिनी दुर्गम भागात व विखंडीत असल्याने 0.40 हे. पेक्षा कमी जमीन धारणा असलेले दोन किंवा अधिक लाभार्थी एकत्र आल्यास त्यांची एकत्रित जमीन किमान 0.40 हे. इतकी होत असल्यास त्यांनी करार लिहून दिल्यास त्यांना योजनेचा लाभ अनुज्ञेय राहील.(याकरिता एकत्रित कुटुंब असलेबाबतचे रेशनकार्ड जोडणे आवश्यक राहील).त्याचप्रमाणे दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्यांना कमाल ०.६ हे. धारणक्षेत्राची अट लागू असणार नाही . विहीत नमुन्यातील मागणी अर्ज पंचायत समितीकडील कृषि अधिकारी (विघयो) यंाचेकडे उपलब्ध आहे.

## लाभार्थी निवड निकष व योजनसाठो लाभाथी पात्रतेच्या अटी -:

1. लाभार्थी हा अनुसूचित व नवबौध्द प्रवर्गातील शेतकरी असला पाहिजे.
2. शेतकऱ्याकडे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
3. शेतकऱ्याच्या नावे जमिन धारणेचा ७/ १२ दाखला, 8-अ चा उतारा असणे आवश्यक आहे., (नगरपंचायत, नगरपालिका ब महानगरपालिका क्षेत्राबाहेरील)
4. लाभार्थ्याकडे आधार कार्ड व बँक खाते असणे आवश्यक आहे व सदर बँक खाते आधार कार्डशी संलग्न असणे आवश्यक आहे.

5. दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्यास प्रथम प्राधान्य राहील

6. सदर योजनेच्या लाभार्थीसाठी लागू असलेली र.रु. 1,50,000/- वार्षिक उत्पन्न मर्यादेची अट रद्द करण्यात आली आहे.

7. सदर लाभार्थींकडे किमान 0.40 हेक्टर व कमाल 6 हेक्टर एवढी शेतजमीन असणे आवश्यक असेल. मात्र, लाभार्थ्याच्या जमिनी दुर्गम भागात व विखंडीत असल्याने 0.40 हे. पेक्षा कमी जमीन धारणा असलेले दोन किंवा अधिक लाभार्थी एकत्र आल्यास त्यांची एकत्रित जमीन किमान 0.40 हे. इतकी होत असल्यास त्यांनी करार लिहून दिल्यास त्यांना योजनेचा लाभ अनुज्ञेय राहील.(याकरिता एकत्रित कुटुंब असलेबाबतचे रेशनकार्ड जोडणे आवश्यक राहील).त्याचप्रमाणे दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्यांना कमाल 0.6 हे. धारणक्षेत्राची अट लागू असणार नाही

8. एकदा संबंधित योजनेचा पूर्ण लाभ घेतल्यास पुढील पाच वर्ष त्याच लाभार्थ्यास किंवा कुटुंबास या योजनेचा लाभ देय होणार नाही.

9. अशाच स्वरुपाच्या कृषी विषयक विकास योजनेकरता विशेष घटक योजनेतून तसेच केंद्र शासनाच्या SCA व घटनेच्या कलम २७५ ( A) अंतर्गत उपलब्ध करुन दिलेल्या निधीतून राबविण्यात येणाऱ्या योजनेतून लाभ दिला असल्यास या योजनेंतर्गत देण्यात येणारा लाभ अनुज्ञेय असणार नाही.

10. सदर योजनेचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांच्या ७/१२ उताऱ्यावर त्याबाबतची नोंद घेण्यात येईल.

## योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे -

1) 8-अ व 8-अ प्रमाणे सर्व 7/12 उतारे

2) जातीचा दाखला (सत्यप्रत)

3)आधार कार्ड

4) बँक पासबुक

5)लाभार्थी निवडीचा ग्रामसभा ठराव

या योजनेअंतर्गत लाभ घेवू इच्छिणा-या पात्र अनु. जमातीतील शेतक-यांनी आवश्यक कागदपत्रांसह ऑनलाईन अर्ज mahadbt.maharashtra.gov.in/farmer/login/login या संकेतस्थळावर दाखल करावा.

## योजनेचा लाभ घेण्यास

योजनेचा लाभ घेण्याचं दृष्टीने महा-डीबीटी पोर्टलचे mahadbt.maharashtra.gov.in/farmer/login/login हे संकेत स्थळ आहे. या संकेत स्थळावरील शेतकरी योजना हा पर्याय निवडावा, सादर योजनेबाबत अधिक माहिती जाणुन घेणेसाठी आपल्या संबंधित पंचायत समितीतील कृषि अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा.

**योजनेचे फायदे :-** अनुसुचित जाती / नवबौध्द शेतक-यांना दारिद्रय रेषेवर आणनेसाठी सदर योजनेचा फायदा होणार आहे.

❖ **जिल्हा परिषद स्वनिधीतील योजना :-**

सन २०२४ - २५ मध्ये जिल्हा परिषद स्वनिधीतून दि. ०५ डिसेंबर २०१६ च्या शासन निर्णयान्वये थेट लाभ हस्तांतर ( DBT) कार्यप्रणाली प्रमाणे ५० % अनुदानावर योजना राबविणेत येणार आहेत. त्यामध्ये खालील प्रमुख योजनांचा समावेश आहे.

१. **योजनेचे नांव :-** 50% अनुदानावर शेतकऱ्यांना जलसिंचन साधने पुरविणे.

योजना कोणाची :- जिल्हा परिषद स्वनिधी.

**योजनेची संक्षिप्त माहिती :-** जिल्हा परिषद स्वनिधीतुन जलसिंचन साधनासाठी अनुदान देणेत येणार आहे . जलसिंचन साधणे पिकांना पाणी देणेसाठी पुरविणेत येणार आहेत . त्यासाठी जिल्हास्तरीय खरेदी समितीने निश्चित केलेल्या मापदंडानुसार व दरानुसार किंमतीच्या 50% अनुदान देय राहील जिल्हास्तरीय खरेदी समितीने निश्चित केलेल्या . मापदंडानुसार लाभार्थी शेतक यांने जलसिंचन साधनांची स्थानिक बाजारातुन- अधिकृत विक्रेत्याकडून गट विकास अधिकारी/उत्पादक, पंचायत समिती यांचे पुर्व संम्मतीने विहीत कालावधीत स्वत खरेदी पश्चात . खरेदी करणे आवश्यक राहील : तपासणी नंतर अनुदानाची रक्कम लाभार्थीचे बँक खात्य बँक खातेत वर्ग करणेत येईल. तसेच प्रति लाभार्थींना र.रु 10,000/- प्रमाणे लाभ देणेत येईल.

**योजनेचे फायदे** :- जलसिंचन साधणांचा वापर करुन पिकांना संरक्षित पाणी देता येणार आहे.त्यामुळे उत्पादनात वाढ होणेस मदत होणार आहे.

२. **योजनेचे नांव :-** 50% अनुदानावर शेतकऱ्यांना **स्लरी युनिट पुरविणे**.

**योजना कोणाची :-** जिल्हा परिषद स्वनिधी.

**योजनेची संक्षिप्त माहिती :-** जिल्हा परिषद स्वनिधीतुन स्लरी युनिट साधनासाठी अनुदान देणेत येणार आहे .स्लरी युनिट साधणे पिकांना पाणी देणेसाठी पुरविणेत येणार आहेत त्यासाठी जिल्हास्तरीय खरेदी समितीने निश्चित केलेल्या मापदंडानुसार . व दरानुसार किंमतीच्या50% अनुदान देय राहील जिल्हास्तरीय खरेदी समितीने . यांने- निश्चित केलेल्या मापदंडानुसार लाभार्थी शेतकस्लरी युनिट साधनांची स्थानिक बाजारातुन उत्पादक अधिकृत विक्रेत्याकडून गट विकास अधिकारी/, पंचायत समिती यांचे पुर्व संम्मतीने विहीत कालावधीत स्वत खरेदी पश्चात .खरेदी करणे आवश्यक राहील : तपासणी नंतर अनुदानाची रक्कम लाभार्थीचे बँक खात्यात वर्ग करणेत येईल.

**योजनेचे फायदे :-** जीवामृत / शेण स्लरी हे नैसर्गिक शेतीसाठी महत्वपूर्ण आहे. जिल्ह्यामध्ये पशुधनाची संख्या मोठ्या प्रमाणात असून बायोगॅसचा वापर मोठ्या प्रमाणात होतो. स्लरी फिल्टर युनिटद्वारे जीवामृत तयार होते. त्याचा शेतकऱ्यांनी वापर केल्यास जमिनीचा पोत सूधारण्यास मदत होते व शेतीतील उत्पन्नात वाढ होवून आर्थिक स्तर उंचावतो.

3.**योजनेचे नांव :-** 50% अनुदानावर शेतकऱ्यांना **पीव्हीसी/एचडीपीई पाईप पुरविणे**.

**योजना कोणाची :-** जिल्हा परिषद स्वनिधी.

**योजनेची संक्षिप्त माहिती :** जिल्हा परिषद स्वनिधीतुन एचडीपीई / पिव्हीसी पाईपसाठी अनुदान देणेत येणार आहे. त्यासाठी जिल्हास्तरीय खरेदी समितीने निश्चित केलेल्या मापदंडानुसार व दरानुसार किंमतीच्या 50% अनुदान देय राहील. जिल्हास्तरीय खरेदी समितीने निश्चित केलेल्या मापदंडानुसार लाभार्थी शेतक-यांने एचडीपीई / पिव्हीसी पाईपची स्थानिक बाजारातुन उत्पादक/अधिकृत विक्रेत्याकडुन गट विकास अधिकारी , पंचायत समिती यांचे पुर्व संम्मतीने विहीत कालावधीत स्वत: खरेदी करणे आवश्यक राहील. खरेदी पश्चात तपासणी नंतर अनुदानाची रक्कम लाभार्थीचे बँक खात्यात वर्ग करणेत येईल.

**योजनेचे फायदे :-** एचडीपीई पिव्हीसी पाईपचा उपयोग विविध पिकांना संरक्षित पाणी / पाण्याचा होणारा अपव्यय टाळणे व पाण्याची बचत करणे शक्य .देणेसाठी होणार आहे .याचे उत्पादनात वाढ होणेस मदत होणार आहे-त्यामुळे शेतक.होणार आहे

४. **योजनेचे नांव :- बायोगॅस बांधकामासाठी पुरक अर्थसाहाय्य देणे.**

**योजना कोणाची :-** जिल्हा परिषद स्वनिधी.

**योजनेची संक्षिप्त माहिती :** जि.प.सेस फंडातुन अनुदान दिलेस शेतीसाठी सेंद्रिय शेतीला चालना मिळणार असुन त्यामुळे योजनेवर बायोगॅस उभारणीसाठी (2 ते 4 घ.मी.) सर्वसाधारण रु 14350 /- व अनुजाती -22000/- या प्रमाणे केंद्रशासनाचे अनुदान आहे.तथापि बायोगॅस सयंत्रासाठी बांधकाम साहित्याचे दर वाढल्याने येणारा खर्च जास्त असल्याने जि.प.स्वनिधीतुन पुरक अनुदान देणेसाठी कृषि समिती कडील ठराव क्र-2 दि.14/06/2024 अन्वये शेतकऱ्यांना बायोगॅस बांधकामासाठी पुरक अर्थसहाय्य देणेसाठी मागीलवर्षाप्रमाणे प्रति लाभार्थी रक्कम रुपये 5000 /- अनुदान देय राहील .

5. **योजनेचे नांव :-** 50% अनुदानावर शेतकऱ्यांना **पाचटकुट्टी मशिन पुरविणे**.

**योजना कोणाची :-** जिल्हा परिषद स्वनिधी.

**योजनेची संक्षिप्त माहिती :** जिल्हा परिषद स्वनिधीतुन पाचटकुट्टीसाठी अनुदान देणेत येणार आहे. त्यासाठी जिल्हास्तरीय खरेदी समितीने निश्चित केलेल्या मापदंडानुसार व दरानुसार किंमतीच्या 50% अनुदान देय राहील. जिल्हास्तरीय खरेदी समितीने निश्चित केलेल्या मापदंडानुसार लाभार्थी शेतक-यांने पाचटकुट्टी स्थानिक बाजारातुन उत्पादक/अधिकृत विक्रेत्याकडुन गट विकास अधिकारी , पंचायत समिती यांचे पुर्व संम्मतीने विहीत कालावधीत स्वत: खरेदी करणे आवश्यक राहील. खरेदी पश्चात तपासणी नंतर अनुदानाची रक्कम लाभार्थीचे बँक खात्यात वर्ग करणेत येईल.

**योजनेचे फायदे :-**लाभार्थी शेतकऱ्यांनी ऊसाचा पाला जाळल्याने हवेतील प्रदुषण वाढते व पाचटकुट्टीमुळे ऊसाचा पाला बारीक केल्यामुळे तो जमिनीत गाढला जाऊन जमिनीचा पोत सुधारतो व त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होते.

६. **योजनेचे नांव :-** 50% अनुदानावर **पॉवर टिलर ,रोटावेटर ,विडर पुरविणे**.

**योजना कोणाची :-** जिल्हा परिषद स्वनिधी.

**योजनेची संक्षिप्त माहिती :** जिल्हा परिषद स्वनिधीतुन पॉवर टिलर ,रोटावेटर ,विडर अनुदान देणेत येणार आहे. त्यासाठी जिल्हास्तरीय खरेदी समितीने निश्चित केलेल्या मापदंडानुसार व दरानुसार किंमतीच्या 50% अनुदान देय राहील. जिल्हास्तरीय खरेदी समितीने निश्चित केलेल्या मापदंडानुसार लाभार्थी शेतक-यांने पॉवर टिलर ,रोटावेटर ,विडर स्थानिक बाजारातुन उत्पादक/अधिकृत विक्रेत्याकडुन गट विकास अधिकारी , पंचायत समिती यांचे पुर्व संम्मतीने विहीत कालावधीत स्वत: खरेदी करणे आवश्यक राहील. खरेदी पश्चात तपासणी नंतर अनुदानाची रक्कम लाभार्थीचे बँक खात्यात वर्ग करणेत येईल.

**योजनेचे फायदे :-** जमिनीची मशागत करणे सुलभ होते. त्यामुळे त्यांच्या पीक उत्पन्नात वाढ होऊन आर्थिक स्थिती सुधारेल.

७. **योजनेचे नांव :-** 50% अनुदानावर **कडबाकुटटी मशिन पुरविणे**.

**योजना कोणाची :-** जिल्हा परिषद स्वनिधी.

**योजनेची संक्षिप्त माहिती :** जिल्हा परिषद स्वनिधीतुन कडबाकुटटी मशिनसाठी अनुदान देणेत येणार आहे. त्यासाठी जिल्हास्तरीय खरेदी समितीने निश्चित केलेल्या मापदंडानुसार व दरानुसार किंमतीच्या 50% अनुदान देय राहील. जिल्हास्तरीय खरेदी समितीने निश्चित केलेल्या मापदंडानुसार लाभार्थी शेतक-यांने कडबाकुटटी मशिन स्थानिक बाजारातुन उत्पादक/अधिकृत विक्रेत्याकडुन गट विकास अधिकारी , पंचायत समिती यांचे पुर्व संम्मतीने विहीत कालावधीत स्वत: खरेदी करणे आवश्यक राहील. खरेदी पश्चात तपासणी नंतर अनुदानाची रक्कम लाभार्थीचे बँक खात्यात वर्ग करणेत येईल.

**योजनेचे फायदे :-** जनावारांना चारा बारीक करून घातल्याने जनावरांच्या दुधामध्ये वाढ होण्यास मदत होते व त्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारते.

८. **योजनेचे नांव :-** 50% अनुदानावर **आयुधे पुरविणे (बॅटरी ऑपरेटेड स्प्रे पंप).**

**योजना कोणाची :-** जिल्हा परिषद स्वनिधी.

**योजनेची संक्षिप्त माहिती** : जिल्हा परिषद स्वनिधीतुन पिक संरक्षण औषधासाठी अनुदान देणेत येणार आहे. किड / रोगापासून पिकांचे औषध फवारणी करुन वेळीच संरक्षण करणे व होणारे नुकसान टाळता येणार आहे. त्यासाठी जिल्हास्तरीय खरेदी समितीने निश्चित केलेल्या मापदंडानुसार व दरानुसार किंमतीच्या 50% अनुदान देय राहील. जिल्हास्तरीय खरेदी समितीनेनिश्चित केलेल्या मापदंडानुसार लाभार्थी शेतक-यांने स्प्रे पंपाची स्थानिक बाजारातुन उत्पादक/अधिकृत विक्रेत्याकडुन गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांचे पुर्व संम्मतीने विहीत कालावधीत स्वत: खरेदी करणे आवश्यक राहील. खरेदी पश्चात तपासणी नंतर अनुदानाची रक्कम लाभार्थीचे बँक खात्यात वर्ग करणेत येईल.

**योजनेचे फायदे :-** भात, सोयाबीन व ऊस इत्यादी पिकांचे पिकसंरक्षण औषधासाठी अनुदान दिल्यामुळे पिकांचे किड रोगापासुन औषधांची वेळीच / फवारणी केल्यामुळे पिकांचे संरक्षण होणार आहे त्यामुळे पिकांचे होणारे नुकसान . टाळता येणार आहे . किड/रोगापसुन पिकांचे वेळीच संरक्षण केल्यामुळे शेतक याचे उत्पादनात वाढ- होणार आहे.

**९. (नाविन्यपुर्ण योजना )** सन 2024-25 मध्ये सदर योजनेतंर्गत **सागवानी सातेरी मधपेटी** 5 युनिट मधमाशापालन साहित्य खरेदी करणेसाठी एकुण खर्च र.रु 32906/- इतका येणार आहे. त्यापैकी तालुक्यातील निवड केलेल्या पात्र लाभार्थींना महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोदयोग मंडळ, जिल्हा कार्यालय कोल्हापुर यांचे मार्फत 50 % अनुदान 16453/- दिले जाणार असुन उर्वरीत 50% अनुदान र.रू 16453/- जिल्हा परिषद मार्फत दिले जाणार आहे. सदर योजनेमधुन 58 लाभार्थींना 100% अनुदानातुन महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोदयोग मंडळ, जिल्हा कार्यालय कोल्हापुर यांचे संयुक्त विदयमाने राबविणेत येणार आहे.

## योजना राबविण्यासाठी मार्गदर्शक सूचना व लाभार्थी निवडीचे निकष (सर्व योजनांसाठी)

- जास्तीत जास्त लाभार्थी निवडीसाठी प्रचार व प्रसिध्दी करणे.
- लाभार्थी शेतकरी हा अल्प,अत्यल्प भुधारक, मागास वर्गीय लाभार्थी, अपंग लाभार्थी व महिला शेतक-यांना प्राधान्यांने लाभ देणे.
- लाभार्थी शेतकऱ्यांच्या नावे 7/12 असणे आवश्यक आहे.
- समितीने निश्चीत करणेत आलेल्या निकषानुसार पात्र लाभार्थींची निवड करणे.
- लाभार्थी निवडीचे अंतिम अधिकार कृषि समितीचे राहतील .
- मंजुर झालेल्या लाभार्थी यादीनुसार लाभार्थीस वस्तु खरेदीसाठी तालुका स्तरावरून मुदत घालुन सदर सहित्याचे मापदंडासह पूर्व संमतीपत्र देणे.
- लाभार्थीने पूर्व संमतीपत्रानुसार सदर साहित्य मान्यताप्राप्त मापदंडापेक्षा कमी नसलेल्या मापदंडाचे साहित्य उत्पादक कंपनी/कोणत्याही अधिकृत वितरक / विक्रेत्याकडून विकत घेण्याची मुभा राहील.
- लाभार्थी शेतक-यांने सदर साहित्याची खरेदी स्वत: करावयाची आहे.
- लाभार्थी शेतकरी स्वत: विक्रेत्याकडून साहित्याची खरेदी करणार असल्याने साहित्याचे गुणवत्तेसंदर्भात कृषि विभाग जिल्हा परिषदेचे कोणतीही आर्थिक जबाबदारी असणार नाही.
- लाभार्थी शेतक-यांने वरील प्रमाणे कृषि साहित्याची खरेदी केल्यानंतर जीएसटी सहितची देयकाची प्रत विक्रेत्याकडून घ्यावी व देयकाची स्वयंसाक्षाकीत प्रत,पाचटकुट्टी ,पावर विडर , रोटावेटर , पावर टिलर ,स्लरी फिल्टर युनिट, स्प्रेपंप ,इले.मोटर , पी.व्ही.सी पाईप या बाबत सक्षम प्राधिकरणा कडील तपासणी अहवाल झेरॉक्स प्रत, मोका तपासणी अहवाल झेरॉक्स प्रत साहित्यासह खरेदी फोटो इ. गट विकास अधिकारी यांचेकडे सादर करावी.

- पाचटकुट्टी / मल्चर / रोटावेटर  चा लाभ घेणे करीता लाभार्थीकडे स्वमालकीचा  किमान 40 HP चा ट्रॅक्टर असणे आवश्यक ,मागणी अर्जा सोबत ट्रॅक्टरची Rc book झेरॉक्स बंधनकारक.
- पाचटकुट्टी / मल्चर / रोटावेटर चा लाभ घेणे करीता शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपनी ,महिला बचत गट,विकास सेवा सोसायटी यांचे गटातील सदस्यांचा ट्रॅक्टर असलेस त्याला गटांने प्राधिकृत केलेला ठराव आवश्यक.
- दिलेल्या पूर्व संमतीपत्राप्रमाणे संबधीत लाभार्थी शेतक-यांने खरेदी केलेल्या वस्तुची संबंधित अधिकारी यांचे मार्फत भौतिक पहाणी करुन खात्री करणे.
- दिलेल्या आर्थिक तरतुदीच्या अधीन राहून अनुदान संबंधित लाभार्थी शेतक-यांचे आधारकार्ड संलग्न बँक खात्यात तालुकास्तरावरुन RTGS / ZPFMS द्वारे जमा करणेत यावे.

**योजनेचे नांव** :- 50 टक्के अनुदानावर गांडुळ खत / कल्चर पुरविणे.

**योजना कोणाची :-** जिल्हा परिषद स्वनिधी.

**योजनेची संक्षिप्त माहिती :-** जमिन सुपिकतेसाठी गांडूळाचे कार्य सुपरिचीत आहे.शेतक-यांनी गांडूळ खत विकत न घेता खताचे उत्पादन स्वत: सुरू करणेसाठी हे तंत्रज्ञान प्रात्यक्षिकासह दाखविणेसाठी गांडूळ खत निर्मिती केंद्र सुरु करणेत आले आहे. शेतक-याकडे मोठ्या प्रमाणात उपलब्ध असणा-या पिकाचे अवशेष ,काडीकचरा,जनावरांचे शेण यापासून उत्तम प्रतिच्या गांडूळ खताची निर्मिती करता येते. गांडूळ खताच्या वापरामुळे जमिनीचा पोत सुधारुन उत्पादन वाढते. शेंद्रीय शेती पध्दतीने चालना देणे , रासायनिक खतावरील होणारा जादा खर्च कमी करणे , गांडूळ खताच्या वापराने उत्पादित मालाची प्रत , गुणवत्ता सुधारणे  या उद्देशाने जिल्हा परिषदेच्या कृषि विभागामार्फत कमी खर्चातील गांडूळ खत निर्मिती प्रकल्प शेतक-यांनी स्वत: उभारण्यासाठी त्यांना प्रवृत्त करण्यासाठी व्यापक प्रमाणात प्रयत्न केले आहेत.

या केंद्रामधून जिल्ह्यातील शेतक-यांना उत्कृष्ट प्रतिचे गांडूळ खत प्रति किलो दर रुपये 20/- व गांडूळ कल्चर प्रति किलो रुपये 400/- प्रमाणे पुरवठा करण्यात येते. त्यासाठी जिल्हापरिषद सेस फंडातून शेतक-यांना 50% अनुदानावर म्हणजेच रुपये 10/- प्रतिकिलो प्रमाणे गांडूळ खत व रुपये 200/- प्रतिकिलो प्रमाणे गांडूळ कल्चर उपलब्ध करुन देणेत येते. तसेच नविन प्रकल्प करणा-या शेतक-यांना गांडूळ खत निर्मितीचे मोफत प्रशिक्षणही या केंद्राकडून दिले जाते.

# राष्ट्रीय बायोगॅस व सेंद्रिय खत कार्यक्रम

सदर योजनेचा उददेश खालील प्रमाणे

- स्वयंपाकासाठी बायोगॅस पुरविणे
- एल.पी.जी.व इतर पांरपारीक उर्जा साधनांचा वापर कमी करणे
- एकात्मीक उर्जा धोरणात नमुद केल्यानुसार स्वंयपाकासाठी आवश्यक उर्जा मिळविणे
- रासायनीक खताचा वापर कमी करुन सेद्गीय खताचा वापर करण्यास लाभार्थिना प्रवृत करणे
- ग्रामीण भागातील स्त्रीयांचे जीवनमान सुधारणे व त्यांना होणारा त्रास कमी करणे.
- बायोगॅस सयंत्रास शौचालय जोडून ग्रामीण भागातील स्वच्छता राखण्यास मदत करणे
- कार्बनडायऑक्साइड आणि मिथेन यासारख्या वायूंचे वातावरणातील उत्सर्जनाचे प्रमाण घटवून वातावरण बदलांचे नियमन करणे
- निसर्गातील वृक्ष तोडीस आळा घालून निसर्गाचा समतोल राखणे
- बायोगॅस पासून विज निर्मीती करून कौटूबिक गरजा भगविणे.

  इ. बाबी बायोगॅस उभारणीतून साधता येतात.

## योजनेचे फायदे.:-

- बायोगॅस सयंत्रामध्ये कुजवण्याची प्रकीया बंद जागेत होत असते तो वातावरणात पसरत नाही तर त्यापासुन गॅस निर्माण होतो व त्या वायुचे स्वयंपाकासाठी ज्वलंन होते व त्यातुन विषारी वायुचा नायनाट होतो त्यामुळे व प्रदुषण होत नाही.
- बायोगॅस सयंत्रामधुन बाहेर पडणारी रबडी (स्लरी) म्हणजे शेतीसाठी लागणारे उकृष्ट दर्जाचे सेंद्गीय खत होय. त्यामुळे जमिनीची पोत सुधारते. व पिकांच्या उत्पादनातही वाढ होते.
- घरगुती चुलीमुळे होणा-या धुरातील कार्बन डाय ऑक्साइड या विषारी वायुचे प्रदूषण होते तसेच महीलांच्या डोळयांसाठी सुध्दा अपायकारक आहे.हे आपल्याला बायोगॅसमुळे टाळता येते. स्वंयपाक कमी वेळेत करता येतो.
- रिकाम्या जागेत केलेल्या मानवी व पशु विष्ठेमुळे हवेतील प्रदुषणामुळे व डासांमुळे कॉलरा , गॅस्ट्रो, मलेरिया, डेंगु इ. महाभयंकर रोगांचा फैलाव होतो. तो आपण सयंत्रास शौचालय जोडल्यामुळे रोखु शकतो. व ग्रामीण भागातील जनता आरोग्यदायी होवुन गाव प्रदुषण मुक्त होते. म्हणजेच निर्मल गाव स्वच्छ व सुंदर बनते.
- गोबरगॅससाठी शेंणाची गरज असल्यामुळे जनावरे पाळणे हे आवश्यक आहे. परंतु जनावरांमुळे आपल्याला शेंतीची मशागत व त्यांच्यापासुन मिळणारे दुधदुभते यामुळेही आर्थिक फायदा होतो.

- घरगुती चुलीसाठी लाकडांचे जळन आवश्यक असते सर्वसाधारण पणे एका कुटूबांसाठी वर्षाकाठी एका वृक्षाचे लाकुड जळणासाठी लागते त्यामुळे मोठया प्रमाणात वृक्ष तोड होते परंतु बायोगॅस मुळे जंगल तोडीस आपोआपच आळा बसतो.
- बायोगॅस योजनेचा महत्वाचा फायदा म्हणजे बायोगॅस सयंत्रास शौचालय जोडल्यामुळे ग्रामीण भागागतील स्वच्छतेचा प्रश्न निकाली काढण्यासाठी मदत होते.

## योजनेचा पात्र लाभार्थि

ग्रामीण भागातील ज्या लाभार्थिकडे स्वःताची जनावारे व बायोगॅस बांधकामासाठी जागा आहे तो सदर योजनेचा पात्र लाभार्थि आहे.

बायोगॅस बांधकाम केलेस मिळणारे अनुदान :-

ग्रामीण भागात बायोगॅस बांधकाम केलेस केंद्ग शासनाचे नवीन आणि नवीकरणीय मंत्रालया मार्फत खालील प्रमाणे अनुदान दिले जाते.

राष्ट्रीय बायोगॅस विकास योजना   वर्ष  2024-25

- सन 1982 ते मार्च-2023 अखेर बांधकाम केलेल्या बायोगॅस सयंत्राची संख्या :- 123454
- सन 1982 ते मार्च-2023 अखेर बायोगॅसला शौचालय जोडलेल्या सयंत्राची संख्या :- 96748
- सन 1982 ते मार्च 2023 अखेर बांधलेल्या मागास वर्गीय बायोगॅस लाभार्थी संख्या :- 4530
- सन 1982 ते मार्च 2023 अखेर बायोगॅससाठी वाटप केलेल्या अनुदानाची रककम :- 79 कोटी
- सन 2024-25 चे बायोगॅस बांधकामाचे भौतिक उद्दिष्ट :- 720 ( जनरल- 699+ मागास-21)
- माहे 15 जानेवारी 2025 अखेर साध्य :- 375
- मागास- उदिष्ट- 21 साध्य- 5
- शौचालय जोडलेले बायोगॅस सयंत्रे :-328
- बांधकाम चालू सयंत्रे :- 79
- प्राप्त अनुदान रक्कम रु. :- Nill
- खर्च अनुदान रक्कम रु. :- – Nill

सदर योजनेतून मागील 9 वर्षात बायोगॅस सयंत्राचे दिलेले उद्दिष्ट व साध्य खालील प्रमाणे आहे.

| वर्षे | राज्य उदिष्ट | जिल्हा उदिष्ट | जिल्हा साध्य | राज्याशी % वारी | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 2007-08 | 13500 | 5330 | 7037 | 52 | राज्यात प्रथम |
| 2008-09 | 15000 | 8500 | 8500 | 56 | राज्यात प्रथम |
| 2009-10 | 8000 | 2460 | 2460 | 30 | राज्यात प्रथम |
| 2010-11 | 20000 | 5500 | 5503 | 28 | राज्यात प्रथम |
| 2011-12 | 20000 | 5000 | 5019 | 25 | राज्यात प्रथम |
| 2012-13 | 16000 | 4100 | 4123 | 25 | राज्यात प्रथम |
| 2013-14 | 12600 | 3400 | 3400 | 27 | राज्यात प्रथम |
| 2014-15 | 14200 | 3780 | 3780 | 27 | राज्यात प्रथम |
| 2015-16 | 14660 | 3998 | 4021 | 28 | राज्यात प्रथम |
| 2016-17 | 13933 | 3735 | 3351 | 24 | राज्यात प्रथम |
| 2017-18 | 9200 | 1727 | 1745 | 19 | राज्यात प्रथम |
| 2018-19 | 8257 | 1017 | 1017 | 12 | राज्यात प्रथम |
| 2019-20 | 7500 | 1070 | 1070 | 14 | राज्यात प्रथम |
| 2020-21 | 7000 | 1046 | 1046 | 15 | राज्यात प्रथम |
| 2021-22 | 0 | 680 | 680 | | या वर्षी योजनेस उददीष्ट नव्हते |
| 2022-23 | 5104 | 1015 | 1015 | 20 | राज्यात प्रथम |
| 2023-24 | 4651 | 1012 | 1012 | 22 | राज्यात प्रथम |
| 2024-25 | 2800 | 735 | 690 | 25% | राज्यात प्रथम |

**अनुदान-**

1 घ.मी- जनरल- रु.- 9,800/- मागास-रु.- 17,000/- 2 ते 4 घ.मी- जनरल-रु.-14,350/- मागास-रु.-22,000/- ,6 घ.मी- जनरल-रु.-22,750/- मागास-रु.-29,250/-व शौचालय जोडलेस अतिरिक्त रु. 1600/-

सन १९८२-८३ ते 2023-24 अखेर बायोगॅस योजना माहीती. ( जि.प.कोल्हापूर )बायोगॅस बांधकामासाठी लाभार्थिची अर्थिक कुवत नसेल तर त्यासाठी राष्ट्रीयकृत व सहकारी बँका कडूनकर्ज पुरवठा केला जातो. या शिवाय बायोगॅसचा स्वयपाकाव्यतीरीक्त इतर कारणासाठी वापर केलेस उदा.इतर उर्जा साधनांचा वापर कमी करुन डिझेल बचत करणे,जनरेटर,रेफ्रिजटेर यांच्या वापरासाठी बायोगॅसचा वापर केलेस प्रति सयंत्रास अनुदान देणेत येते .

सदर योजना राबवित असताना सन १९८२ ते ८३ ते सन 2023-24 अखेर देशात व राज्यात अनेक बक्षीस योजना राबविली जात असे व त्यात आपल्या जिल्हयास तसेच जिल्हा परिषदेस अनेक बक्षीसे मिळाली आहेत.

# जिल्हा परिषद स्वीय निधीमधील योजना

जिल्हयातील शेतक-याना प्राधान्याने अल्प,अत्यल्प भुधारक व मागासवर्गीय शेतक-याना खालील बाबीचे वाटप ५० टक्के अनुदनावर करणेत येते.

1) जलसिंचन साधने पुरविणे
2) कडबाकुटटी यंत्र
3) स्लरी युनिट पुरविणे
4) गांडूळकल्चर
5) पीव्हीसी / एचडीपीई पाईप
6) बायोगॅस बांधकामासाठी पुरक अर्थसहाय्य देणे
7) पाचटकुट्टी मशिन
8) पॉवर टिलर, रोटावेटर, विडर पुरविणे
9) आयुधे पुरविणे

**सुधारीत कृषी औजारे जिल्हा परिषद परिसर विकास कृषि प्रात्यक्षित व प्रशिक्षण प्रकल्प :-**

- जिल्हा परिषद इमारतीच्यार परिसरातील एकूण ३ एकर क्षेत्राच्या अतिक्रमणापासून बचाव करणे,परिसराची स्वच्ठता ठेवणे,जिल्हयातील शेतक-याना शेतीच्या सुधारीत तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षित दाखविणे,कांही प्रमाणात आर्थिक उत्पन्न मिळविणे या उददेशाने जिल्हा परिषद परिसरामध्ये कृषि विभागामार्फत कृषि प्रात्यक्षिक व प्रशिक्षण प्रकल्प राबविणेत येत आहे. प्रकल्प कार्यान्वियत करताना प्रथमताः प्रक्षेत्रास तार कंपौंडसह दगडी संरक्षक भिंत बांधकाम,नाल्यावर दगडी गटर्स बांधकाम,अस्तित्वातील विहीरींची खोली वाढविणे.विंधन विहीरींची खुदाई, जंगली झाडे काढून जमिनीचे सपाटीकरण या पायाभूत सुविधा निर्माण करणेत आल्या.

  प्रकल्पांतर्गत दाखविण्यात येणारी प्रात्यक्षिके :
- गांडूळ खत निर्मिती केंद्ग : जमिन सुपिकतेसाठी गांडूळाचे कार्य सुपरिचीत आहे. शेतक-यांनी गांडूळ खत विकत न घेता खताचे उत्पादन स्वतः सुरु करणेसाठी हे तंत्रज्ञान प्रात्यक्षिकासह दाखविणेसाठी गांडूळ खत निर्मिती केंद्ग सुरु करणेत आले आहे.यामध्ये उत्पादीत गांडूळ खत कल्चरची विक्री रास्त भावात केली जात
- छतावर पडणा-या पावसाच्या पाण्याची साठवणूकः भूगर्भातील पाण्याच्या अतीवापराने पाण्याचे दुर्भिक्ष जाणवते. या टंचाईवर मात करणेसाठी अल्पखर्चात जलसंधारणाचे प्रात्यक्षिक दाखविण्याच्या उद्देशाने रुफ वॉटर पध्दतीने इमारतीवर पडणारे पावसाचे पाणी विहीरीमध्ये संकलित करणेत येते.
- प्रकल्पांतर्गत बाबवार प्रत्यक्ष मिळकतीचा तपशिलः सदर प्रकल्पामधून या बाबी प्रात्यक्षिक स्वरुपात जिल्हयातील शेतक-यांना दाखविणेबरोबरच जिल्हा परिषदेस काही प्रमाणात आर्थिक मिळकतही मिळणे अपेक्षित आहे. प्रकल्पामधील उत्पादित गांडूळ खत व कल्चर तसेच रोप वाटीकेतील रोपे यांच्या विक्रीमधून वर्षवार मिळालेली आर्थिक मिळकत खालिलप्रमाणे

| अ.न. | वर्षे | प्राप्त रककम |
|---|---|---|
| १ | २०११-१२ | ३४८५०३/- |
| २ | २०१२-१३ | ४७४५५५ |
| ३ | २०१३-१४ | ३७८९९५ |
| ४ | २०१४-१५ | ४७६३९० |
| ५ | २०१५-१६ | १४६९१० |
| ६ | २०१६-१७ | ११७७९० |
| ७ | २०१७-१८ | १५२५८० |
| ८ | २०१८-१९ | ३८३०० |
| ९ | २०१९-२० | ६११६० |
| १० | २०२०-२१ | ११०३२० |
| ११ | २०२१-२२ | ३६८६० |
| १२ | २०२२-२३ | ३२५५६० |
| १३ | २०२३-२४ | २०२९६ |
| १४ | २०२४-२५ | ३४५००० |
| एकूण | | ३०३३२१९ |

प्रकल्पासाठी किमान कर्मचारी वर्ग व मजुरांचा वापर करणेत येत असून जिल्हा परिषदेच्या या प्रात्यक्षिक प्रकल्पास जिल्हयातील अनेक पदाधिकारी,मान्यवरांनी ,अधिकारी,प्रगतशील शेतकरी यांनी भेटी दिल्या असून जिल्हा परिषदेच्या या उपक्रमाची प्रशंसा केलेली आहे.